सकाळ

# 'निखळ- जागर संवेदनांचा' हितगूज साधणारे

## प्रा. हरी नरके; अलोक जत्राटकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. २०** : 'निखळ- जागर संवेदनांचा' हे पुस्तक निखळ मैत्री भावनेने वाचकांशी हितगुज करणारे पुस्तक आहे. यातील लेखातून विविध विषयांची केवळ माहितीच मिळते असे नाही, तर जगण्याच्या कोलाहलात निर्माण होणाऱ्या समस्यांतून सुटण्याची उमेद आणि ऊर्जा मिळते. हे पुस्तक उपयुक्त आहे.'' असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर लिखित 'निखळ जागर संवेदनांचा' या ललित गद्य संग्रहाचे प्रकाशन प्रा. नरके यांच्या हस्ते झाले या वेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्रा. नरके म्हणाले, ''या पुस्तकाची सुरुवात सोन्याचा दिवस या लेखातून होते, यात मित्राचे लग्न ठरल्याचा मित्राला आनंद होतो तो शब्दरूपात आहे.'' श्री. जत्राटकर म्हणाले, ''माझे पुस्तक माझ्या आजोबांना अर्पण केले आहे, त्यांच्याकडून समता, नैतिकमूल्य, विषमताविरहित व्यवहार, समाताधिष्ठीत आचरण आणि माणूस म्हणून आपले वर्तन कसे असावे, याची ओळख झाली. त्यामुळे लेखन करताना ते भान सतत जागृत राहिले. या लेखांना ब्लॉगवर चांगला प्रतिसाद मिळाला. मित्रमंडळीच्या प्रयत्नातून पुस्तक आले.'' प्रा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले. रावसाहेब पुजारी यांनी स्वागत केले. प्रकाशक सुनील पाटील प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : अलोक जत्राटकर लिखित 'निखळ- जागर संवेदनांचा' या पुस्तकाचे मंगळवारी प्रकाशन करताना प्रा. हरी नरके. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. सुनील पाटील, अलोक जत्राटकर आदी.**